सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हटल तर तो उद्या कधीच येत नाही

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २३ मे २०२५ | अंक १६० • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007 · All TOURS घर से घर तक · दिल से दिल तक · www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# वैष्णवी हगवणे संशयास्पद मृत्यू प्रकरणात राजेंद्र हगवणे, सुशील हगवणे यांना अटक



पुण्यातील मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे यांचे मृत्यू प्रकरण सध्या चर्चेत आले आहे. वैष्णवी संशयास्पद मृत्यू प्रकरणात फरार असलेले राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे यांना आज पहाटे अटक झाली आहे. स्वारगेट परिसरात त्यांना अटक करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे यांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. त्यांनी आत्महत्या केल्याचे सुरुवातीला समोर आले होते. परंतु त्यांच्या शवविच्छेदन अहवालात शरीरावर मारहाणीच्या खुणा मिळाल्या आहेत. तसेच वैष्णवी हिच्या आई-वडिलांनी तिचा हुंड्यासाठी छळ होत असल्याचा आरोप करुन तिची हत्या झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. पुणे पोलिसांनी वैष्णवीचा नवरा शशांक, नणंद करिश्मा आणि सासू लता हगवणे यांनाही आधीच अटक केली होती. आता राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे यांनी शुक्रवारी पहाटे अटक करण्यात आली आहे. गेल्या सात दिवसांपासून फरार होते. राजेंद्र हगवणे हे तळेगाव येथील एका हॉटेलच्या सीसीटीव्हीमध्ये गुरुवारी कैद झाले होती. ही माहिती पिंपरी चिंचवड पोलिसांना समजताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. परंतु या घटनेची अधिकृत माहिती अजूनही पोलिसांनी दिली नाही. यासंदर्भात पोलिसांकडून पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली जाण्याची शक्यता आहे. सासरी होत असलेल्या छळाला कंटाळून वैष्णवी शशांक हगवणे (वय 23) हिने आत्महत्या केल्याचे सांगितले जात होते. परंतु तिच्या आई-वडिलांनी तिची हत्या झाल्याचा आरोप केला. माध्यमांमधून हे प्रकरण समोर आल्यानंतर पोलिसांनी वेगाने कारवाई सुरु केली. वैष्णवीचा पती शशांक राजेंद्र हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा राजेंद्र हगवणे यांना अटक करण्यात आली. परंतु वैष्णवीचा सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते. त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली होती.

### कुणाच्या लग्नाला गेलो ही माझी चूक काय?

तुम्ही घरचे लोक आहात मी सांगतो, तुम्ही अनेक जण मला लग्नाला बोलावता. शक्य असेल तेवढं यायचा मी प्रयत्न करतो, त्या भागात असेन तर उशिरा का होईना मी लग्नाला हजेरी लावतो. आता एखाद्या लग्नाला मी गेलो, आणि त्यांनी नंतर त्यांच्या सुनेला काही वेडवाकडं केलं, त्रास दिला तर तिथे माझा (अजित पवारचा) काय संबंध आहे ? असा थेट सवाल अजित दादांनी विचारला. अजित पवारनी त्यांना सांगितलं का असं कर म्हणून ? मला तर काही कळतच नाही. ही घटना घडल्या घडल्या मी पिंपरी-चिंचवडच्या सीपींना म्हटलं की, कोणी का असेना ॲक्शन घे.

## ॲग्रिस्टॅकफअंतर्गत पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक

बीड, दि. 22 :- महाराष्ट्र राज्याच्या जमाबंदी आयुक्तालय आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेवर मिळवून देण्यासाठी 'ॲग्रिस्टॅक' योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची माहिती संकलित करणे आणि त्या माहितीच्या आधारे सरकारी योजनांचे कार्यान्वयन अधिक प्रभावी व सुलभ बनवणे आहे. राज्यातील कृषिक्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांना लाभ देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला असून 'ॲग्रिस्टॅक' अंतर्गतच पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सुद्धा फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला आहे .पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ॲग्रिस्टॅक अंतर्गत नोंदणी गरजेची आहे. तरी शेतकऱ्यांनी विनाविलंब 'ॲग्रिस्टॅक नोंदणी करून घ्यावी जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

## येळी घाटावर अवैध वाळू उत्खननाविरोधी पोलिस व महसूल प्रशासनाची धडक कारवाई



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : येळी घाटावर पोलीस व महसूल प्रशासानाने अवैध वाळू उत्खनना विरोधी धडक कारवाई करुन 9 इंजिन 3 जेसीबी एक हायवा ट्रॅक आणि एक टिपर जप्त करुन पोलीस स्टेशन उस्माननगर येथे ठेवण्यात आल्या आहेत. त्याविरुध्द पोलीस विभागा तर्फे फौजदारी कारवाई करण्यात येणार असून महसूल विभागामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.ही कारवाई जिल्हाधिकारी राहूल कर्डीले, पोलीस अधिक्षिक अबिनाश कुमार यांच्या मागर्दशनाखाली तहसिलदार लोहा तसेच खंडेराय पोलीस निरीक्षक स्थानिक गुणे शाखा नांदेड श्री. मुळीक सहाय्यक पोलीस निरीक्षक उस्माननगर तसेच मंडळ अधिकारी कटारे, सहारे, तलाठी एकाडे, तलाठी बोधने, तलाठी आस्कुलकर, तलाठी रायाजी, तलाठी बोधगीरे, तलाठी परशुराम जाधव, तलाठी डी.जी. शिंदे, तलाठी मोतीराम जाधव, तलाठी मेवणकर, तलाठी लाडेकर यांनी उपरोक्त कारवाई केली,अशी माहिती तहसीलदार लोहा यांनी दिली.

## बीडच्या जिल्हा परिषद परिसरात शिवसंग्राम च्या कृष्णा उरवडे यांच आमरण उपोषण,



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी धारूर तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या बोगस हंगामी वस्तीग्रह 2024 ,25 ची चौकशी करून संबंधित गटशिक्षणाधिकारी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक व चौकशी अधिकारी श्रीमती मैना बोराडे यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी आमरण उपोषण धारूर येथील शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष कृष्णा उकंडे यांचं बीड जिल्हा परिषद आवारात आमरन उपोषण चालू आहे , आपल्या कार्यालामार्फत सदरील तक्रारीचे अनुषंगाने चौकशी समितीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी चौकशी दरम्यान गावनिहिय हंगामी वस्तीगृहाचे चावडी वाचन करण्यात यावे ,यामध्ये पालक व विद्यार्थ्यांचे जबाब नोंदवण्यात यावे व सदरील चौकशी इन कॅमेरे करण्यात यावी यासाठी मी जिल्हा परिषद परिसरात आमरण उपोषण करीत आहेत, व गटशिक्षणाधिकारी कार्यालय धारूर अंतर्गत केंद्रप्रमुख पदी नियमबाह्य पदोत्तरणी नियुक्ती करणाऱ्या दोषी अधिकारी व बोगस केंद्रप्रमुख यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याअंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, व माझ्या विविध मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या काळात कठोर उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष कृष्णा उकंडे यांनी दिला आहे,

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा नांदेड दौरा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व राखीव. शुक्रवार 23 मे रोजी सकाळी 10.30 वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा व भेट. सकाळी 11.30 वा. नांदेड येथून मोटारीने परभणीकडे प्रयाण करतील.

## अवकाळी पावसाने झालेल्या शेत पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा–मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील

मुंबई, दि. २२ : राज्यात काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी. मंत्री श्री. जाधव - पाटील म्हणाले, अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३- २०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी ) रूपये तर २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी ( सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री.

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शहरातील नागरी समस्या वर तातडीने उपाययोजना कराव्यात,नीता अंधारे यांच्याकडे मागणी

बीड (प्रतिनिधी)दि.२२ : शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले. पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली. बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन



यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले. आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी ॲप विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला. शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

# प्रा रसूल सोलापुरे राज्यस्तरीय साहित्यिक पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी- जगदीप वनशिव कोल्हापूर - येथील प्रा. रसूल सोलापुरे बहुउद्देशीय संस्था,महागाव,ता.गडहिंग्लज,जि. कोल्हापूर या संस्थेचे २०२४ चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले.यात लेखक प्रा. इंद्रजीत पाटील,बार्शी यांच्या ' शेलक्या बारा ' या कथासंग्रहाची सर्वोत्कृष्ट कथासंग्रह म्हणून निवड करण्यात आली. असून विशाल मोहोड,अमरावती यांची ' कीड ' ही कादंबरी परीक्षकांना विशेष भावली.कवितासंग्रह विभागात माणदेश कवी लक्ष्मण हेंबाडे,मंगळवेढा यांच्या ' पांदवाट कवितासंग्रहाला विशेष मान मिळाला.चारोळीसंग्रह विभागात श्री.प्रकाश पाटील,कोल्हापूर यांचा 'नभांगण' हा चारोळीसंग्रह परीक्षकांच्या नजरेत भरला. तर स्थानिक उत्कृष्ट वाचक पुरस्कारासाठी सौ.रूपाली स्वप्निल शिंदे,मु.पो.भादवळ,जि.कोल्हापूर यांची निवड करण्यात आली.अगदी तज्ञ परीक्षकांनी या साहित्यकृतींचे परीक्षण करून निवड केली असून संस्थेचे अध्यक्ष प्रा.रसूल सोलापुरे यांनी सदर साहित्यिक पुरस्काराची अधिकृतपणे घोषणा केली. असून पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचे विशेष अभिनंदन करून पुढील साहित्यिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. व निवड पत्र दिले असून पुरस्कार येत्या जुलै महिन्यात निवड झालेल्या साहित्यिकांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत असे प्रा. रसुल सोलापुरे यांनी माहिती दिली

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचा नांदेड दौरा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ मर्यादित मुंबईचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा नांदेड दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. शुक्रवार 23 मे रोजी धाराशीव येथून सायं 5 वा. नांदेडसाठी रवाना व शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व मुक्काम. शनिवार 24 मे रोजी सकाळी 9.30 वा . श्रीमती चंद्रकला घोडजकर 48-शाहूनगर नांदेड येथे सदिच्छा भेट. दुपारी 12.30 वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी 3 वा. सोलापूरकडे प्रयाण करतील.

## अवकाळी पावसाने संत्र्याचा मृग बहार धोक्यात



प्रतिनिधी मंगेश खाडे मानोरा:आंबिया बहाराच्या तुलनेत मृग बहाराचा संत्रा चविष्ट असल्याने बाजारात मोठी मागणी असते,मात्र अवकाळी पावसामुळे तालुक्यातील संत्र्याच्या मृग बहार धोक्यात आला असून संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे तालुक्यात यावर्षी भर उन्हाळ्यात अवकाळी पावसाची सरी बर असल्याने संत्रा झाडाला रोगाचा बहार येण्याची शक्यता मावळली आहे. मृग बहराचे संत्रा पिक घेण्यासाठी झाडांना एप्रिल मे महिन्यात किमान ६० दिवसाचा चांगला ताण पडणे आवश्यक आहे त्यासाठी शेतकरी एप्रिल पासून बागांना पाणी देणे बंद करतात मात्र यावर्षी मे महिन्यात तालुका भर अवकाळी पावसाची जोरदार सरी बरसल्या त्यातच सतत दहा ते बारा दिवस ढगाळ

**यावर्षी मृग नक्ष पासून अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे.त्यामुळे मृग बहाराच्या फुटीसाठी आवश्यक वातावरण तयार झाले आहे. सतत तिसऱ्या वर्षी संत्रा मृग बहाराच्या फुटीवर परिणाम झालेला दिसून येत आहे**

वातावरण होते या प्रतिकूल वातावरणाचा फटका संत्र्याच्या मृग बहारला बसला आहे त्यामुळे पूर्व मशागतीची कामे व्यवस्थित पूर्ण करणे शक्य झाली नाही आता संत्रा बागांना फलधारणा होण्याची शक्यता मावळली आहे संत्र्याच्या भागामध्ये इतर पिक घेणे शक्य नसल्याने ती शेती पेरणी विना ठेवावी लागते त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अडचणीत वाढ झाली आहे

# परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नविन नोंदणी मालिका सुरू करण्यात येणार

बीड, दि. 22 :- परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका MH23BM ही सद्यस्थितीत सुरु असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहेत. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी MH23 BP 0001 ते 9999 ही मालिका दि. 03 जून2025 पासून सुरु करण्यात येईल. ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्ज, सदरील आकर्षक क्रमांकाला लागू असलेली फी च्या रकमेचा, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांच्या नावाचा धनादेश वा धनाकर्ष ( Deamand Draft ) व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतीसह दि. 26 मे ते 02 जून 2025 रोजी दुपारी 2.00 पर्यंत कॅश काऊंटर खिडकी क्र. 02 वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दि. 02 जून 2025 रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी 04.00 वाजता प्रसिध्द करण्यात येईल. दि. 03 जून 2025 रोजी एकापेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी 2.00 वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मुळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी 03.00 वाजता लिलावाची विहित कार्यपध्दती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी, नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# कुपटा गाव नजीकची वीटभट्टी हटविण्याची मागणी

प्रतिनिधी ठकसेन गायकवाड मानोरा:तालुक्यातील कुपटा गावाला लागून असलेल्या वीटभट्टी मुळे नागरिकांना विविध आजार जडत आहे त्यामुळे खणी कर्म व महसूल विभागाने याबाबतची दखल घेऊन वीट भट्टी हटवण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे प्रदूषण नियंत्रण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन काहींनी गुप्ता गावाला लागूनच वीटभट्टी व्यवसायात हटला आहे वीट भट्टीच्या काही अंतरावर उतार भागात आरोग्य केंद्र सेतू सेवा केंद्र बस थांबा हॉटेल व काही घरे आहेत वीट भट्टी मधून येणारे दूर प्रदूषणामुळे किडनी स्टोन कॅन्सर आधी सहविरुद्ध आजार जडत असून पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे इंधन म्हणून वापरात येणाऱ्या दगडी कोळशाच्या ज्वलनानंतर सल्फर डायऑक्साइड कार्बन डाय-ऑक्साइड कार्बन मोनो ऑक्साईड आणि नायट्रोजन मधील ऑक्साईड या विषारी वायूंचे उत्सर्जन होते या विषारी वायूतील कल्पना याक्साइडमुळे डोळ्याचे विकार आणि फुफुसाचे व त्वचेचे आजार होतात तसेच कार्बन मोना ऑक्साईड व कार्बन डाय-ऑक्साइड या विषारी वायूमुळे तापमानात वाढ होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो या सर्व कारणामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने वीट भट्टी सुरू करण्यासंदर्भातील नियम शक्तीचे केले



आहेत मात्र काही वीटभट्टी मालक प्रदूषण नियंत्रण मंडळाची कुठलीच परवानगी न घेता राज रोष पणे वीट भट्टीचा कारखाना चालवीत आहेत संबंधित विभागाने या गंभीर बाबीची दखल घेत गावाला लागून असलेल्या वीटभट्टीला पटविण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे

# पुण्यात युवा क्रांती फौंडेशनचा वर्धापनदिन थाटात साजरा..

पुणे : 21 मे 2025 : पुण्यात युवा क्रांती फौंडेशनचा तिसरा वर्धापनदिन थाटात साजरा झाला. चि. नयन नाईक आणि कु.अजया मुळीक या बालकांच्या शुभहस्ते केक कापून वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाची रंगत वाढली. प्रारंभी वसुधा नाईक यांनी प्रास्ताविकात युवा क्रांती फौंडेशनची कार्यपध्दती, ध्येय धोरणं याविषयी विस्तृत माहिती दिली. वर्धापनदिनाचे औचित्य साधून डॉ.मधुसूदन घाणेकर संपादित विश्वविक्रमीडहाळी अनितकालिकाच्या 763 व्या विशेषांकाचे प्रकाशन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याचप्रसंगी डॉ.मधुसूदन घाणेकर यांना



त्यांच्या महाराष्ट्र प्रदेश सल्लागार पदाचे ID वसुधा नाईक यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले तसेच भारती महाडिक यांना महाराष्ट्र प्रदेश मार्गदर्शक पदाचे ID प्रदान करण्यात आले. प्रिया प्रमोद दामले, मधुकर्णिका सारिका सासवडे , रसिका कुलकर्णी, गौरव पुंडे यांचीही भाषणे झाली. दीपाराणी गोसावी यांनी युवा क्रांती फौंडेशनच्या यशस्वी वाटचालीवर एक पोलीस गीत सादर केले. सुरक्षा अधिकारी सोमनाथ चौधरी यांचा वसुधा नाईक यांच्या शुभहस्ते जाहिर सत्कार करण्यात आला.प्रदेश सल्लागार डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी सदर सोहळ्याचा समारोप केला. या कार्यक्रमासाठी उपस्थित वैभव नाईक, कोमल, शीतल नाईक, रवी डिंबळे, रसिका,गावडे सर इत्यादींनी आपले मनोगत सादर केले. पहलगाम येथील हुतात्म्यांना तसेच ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ स्व.डॉ.जयंत नारळीकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली वहाण्यात आली . " कार्यकर्त्यांनी युवा क्रांती फौंडेशनचे कार्य तळागाळापर्यंत पोचवण्यासाठी सामाजिक समरतेवर अधिक भर द्यावा असे प्रतिपादन डॉ.घाणेकर यांनी केले.

================

वसुधा वैभव नाईक, पुणे

# शिवसेना तालुकाप्रमुखपदी माऊली गोंडे यांची वर्णी वडवणी तालुकाभरात शिवसैनिकांचा जल्लोष

वडवणी बीड प्रतिनिधी ; अंकुश गवळी वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मा.ना. एकनाथजी शिंदे (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी शिवसेनेच्या वडवणी तालुकाप्रमुखपदी नुकतीच माऊली गोंडे यांची निवड जाहीर करण्यात आली असून त्यांच्या या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील अनेक वेळा सरपंच भूषवलेले तथा कट्टर शिवसैनिक म्हणून माऊली गोंडे यांचा वडवणी तालुक्यातील गावागावात, वाडी, वस्ती, तांड्या वरील जनमानसात दांडगा जनसंपर्क आहे. आजवर शिवसेना पक्षाने दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या पारदर्शक व गतिमान करण्यासाठी त्यांनी प्रमाणिक काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे यांनी वडवणी तालुका शिवसेना तालुकाप्रमुख पदी नुकतीच माऊली गोंडे यांची निवड करण्यात आली आहे. त्याच बरोबर हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार करत शिवसेना पक्ष वाढीसाठी कार्य कराल असा विश्वास शिवसेना पक्षाला वाटतो म्हणून आपली तालुकाप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे पत्र शिवसेना सचिव संजय मोरे यांनी दिले व त्यांचे अभिनंदन ही केले आहे. शिवसेना तालुकाप्रमुख या पदावर माऊली गोंडे यांची निवड झाल्याची माहिती




मिळताच त्यांचे सर्वस्तरातन अभिनंदन केले जात आहे.

शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार : तालुकाप्रमुख माऊली गोंडे शिवसेनेशी एकनिष्ठ असणारा शिवसैनिक आजही प्रत्येक गावात आणि घराघरात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भगवा अंगा खांद्यावर घेऊन एकनिष्ठ असलेले शिवसैनीक माऊली गोंडे आजही पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या विचारांशी बांधील आहे. आगामी काळात जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून पक्षाला उभारी देण्याचे काम प्रामाणिकपणे करणार आहे. शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार आहे असा निर्धार नवनिर्वाचित वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे यांनी व्यक्त केला.

# गावकुसाच्या साहित्यातले तात्या आणि जीवन गौरव

ताहाराबाद सारख्या सदन गावात मध्यमर्गिय साधारण कुटुंबातील साहेबराव नंदन उर्फ तात्या जेमतेम १० वी पर्यंत शिकले कुटुंबाला आधार म्हणून मिळेल ते काम करत होते पुर्वीच्या काळी गावगाड्याची करमणूक म्हणून अधुनमधून गंमती [ तमाशा ] नाटीका आयोजित केल्या जात असे गावातील हौशी कलाकार एकत्र येऊन हौशी नाटकं बसवायचे.त्या नाटकांचे गावोगावी गणेशोत्सवात सादरीकरण करायचे.त्या हौशी कलाकारांन पैकी एक अवलिया कलाकार साहेबराव तात्या ! ऐशीच्या दशकात खेड्यातील गावकुसाच्या बाराबलुतेदार समाजातील कलावंत शोधून, तात्या स्वतःच कथा पटकथा संवाद गीतरचना व कलावंत म्हणून स्वनिर्मित नाटकात भूमिका करत. त्यांच्या नाटकातून लोकरंजनातून लोक शिक्षण, मनोरंजनातून समाज प्रबोधन हमखास व्हायचेच. काळाच्या पडद्याआड गेलेली त्यांची नाटके आजही चर्चेचा विषय आहे. दारूने झिंगला संसार भंगला , शनिचा फेरा , मेहंदी रंगली रक्ताची, कुंकवाचा करंडा, इ. इ. तात्या वैवाहिक जिवना आधी त्यांनी पोटप्रपंचासाठी अनेकविध उद्योग केले. कधी पानशॉप कधी वाचनालय , बुक स्टॉल न्यूजपेपर एजंट , किराणा, बाजारहाट सर्वच करून पाहिले परंतू त्या काळी वर्तमान आयुष्यात यशाचे दाण पदरात कधी पडलेच नाही. शेवटी रोजीरोटीच्या शोधात नाशिक ला आले अन् नाशिककर झाले. मिळेल ते काम केले , छोटा मोठा व्यवसाय ही केला. काही तरी वेगळं करायची धमक शांत बसू देत नव्हती. म्हणून थोडा काळ नाशिकमध्ये मोठ्या राजकीय पक्षात सहभागी झाले....भा.ज.प सारख्या पक्षात स्थानिक कार्यालयात काम पाहीले पण तेथे मन रमले नाही. कारण तो पिंडच तात्यांचे नव्हता. धार्मिकवृती अंगी असल्याने प्रवचन ही केले. अँकरीग केले, आजही प्रवचन, कथाकथन करण्यात त्यांचा हातखंड आहे. या जिवन प्रवासात कोरोनाचा काळ साहेबराव तात्यांसाठी आयुष्याला कलटणी देणारा ठरला.तेव्हा सर्वत्र संचारबंदी होती.गाव खेड्या पासून ते शहरा पर्यंत सर्वच नागरी वस्त्या ओस पडल्या होत्या एकदम ठ्रुप !हाताला काम नाही, बाहेर पडायला वाव नाही. रिकाम्या वेळेचा सदुपयोग म्हणून तात्या आणि त्यांचे मित्र ललितभाऊ साळवे यांनी सगर समाजातील सामाजिक कार्यकर्ते , ज्ञानवंत, गुणवंत कतृत्ववान उच्चशिक्षित नव्हे नव्हे समाजभान ठेवत गावकुसाच्या गावगाड्यातले पुढारी काय राजकीय, सामाजिक, डॉक्टर वकील, शिक्षक इंजिनिअर,सनदी अधिकारी काय इ.विशेष प्रावीण्य मिळवलेल्या समाजबांधवांनची "जिवन गाथा" सोशल मीडियाच्या माध्यमातून



व्हॉटस् ऍपवर आपल्या लेखणीतून समाजापुढे "" सगर रत्न "" या लेखण मालिकेतून मांडले. त्यावेळी हे लेखण खुप लोकप्रिय झाले होते. समाज उत्सुकतेने पुढील सगर रत्न कोण असतील ? म्हणून वाट पाहत असत. येथेच तात्यासाहेबांन मधला लेखकाचा उदय झाला तो वयाच्या अठठावन्नव्या वर्षी !परत मागे वळून पाहिले नाहीच. एका मागे एक सरस कथा लघुकथा,अलक लिहिले ते समाजाच्या ग्रुपवर , साहित्य समुह, गावखेड्याच्या काळ्यामातीतील काटेकुट्यातील कधी अठराविश्व दारिद्र्य तर कधी सदन कुटुंबातील बायजाकाकू व तुकातात्या डोळ्यात पाणी येईपर्यंत रंगवले.पुढे पुस्तकं लिहिले प्रकाशित केले.त्यातील काही गाजलेले पुरस्कार प्राप्त साहित्य परिसस्पर्श चरित्र कादंबरी , गावगाडा काव्यसंग्रह, सगररत्न विशेषांक , सगरसेवार्थी अंक स्नेहबंध विशेषांक , सगर दीपोत्सव दिवाळी अंक. कथा,लघुकथा,अहिराणी साहित्य प्रसिद्ध आहे....अशा ह्या गरीब परिस्थितीच्या पण उच्च विचारांच्या लेखकाला अनेक पुरस्काराने अनेक संस्थांनी सन्मानित केले आहे आहे.एवढेच काय विविध साहित्य समुह ग्रुपचे शेकडो सत्मानपत्रे अनेक संस्थाचे मानाचे पुरस्कार त्यांच्या नावे आहेत. आता वयाच्या बासष्टीत तीसरा जीवन गौरव पुरस्कार प्राप्त होत आहे. या आधी तात्यांना जळगाव,मुंबई नंतर आता नाशिकमध्ये. तोही छत्रपती संभाजी नगर येथील काळीज माझे साहित्य समुहाचा मानाचा तीसरा जीवन गौरव पुरस्कार आपल्या कर्मभूमीत, गोदातटी नाशिक नगरीत. खान्देशचे भूषण ताहाराबादचे आभूषण साहित्यातले शांत संयमी धीरगंभीर उदात्त विचारांच्या तात्यासाहेबांना आपल्या कर्मभूमीतील "जीवनगौरव" पाहून , तुकातात्या व बायजाकाकू [ काल्पनिक कथेतील ] स्वर्गातून आनंदाश्रूनी सन्मानित करतील यात शंकाच नाही. फक्त हे कौतुक पाहण्यासाठी, त्यांचे वडील स्वर्गीय आनंदराव आण्णा, आई विमलाई, बंधुतुल्य पाठीराखे कै. संभाजीराव पगारे उर्फ बापूसाहेब हवे होते. त्याची उणीव न भरणारी आहे. पुनश्च अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

लेखक
**श्री ज्ञानेश्वर खैरनार प्रसिद्धीप्रमुख सगर साहित्य वडेलकर. ता. मालेगांव जि. नाशिक**



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



## आंतरराष्ट्रीय

# ही कोणत्या युद्धाची तयारी? गोल्डन डोमसाठी ट्रम्प यांच्याकडून १७५ बिलियन डॉलरची तरतूद

जागतिक स्तरावर विविध देशांमध्ये सुरू असणारा संघर्ष आणि मतभेद पाहता आता महासत्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकेनं एक वेगळीच तयारी सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच एक अतिशय महत्त्वाची घोषणा करत संपूर्ण जगाचं लक्ष वेधलं. जिथं त्यांनी महत्त्वाकांक्षी क्षेपणास्त्र भेदक प्रणाली अर्थात 'गोल्डन डोम' बनवण्याची घोषणा केली. सदर प्रणालीच्या माध्यमातून अमेरिका शत्रूकडून होणारा क्षेपणास्त्रांचा मारा फार दूरवरूनच हेरणार असून त्यांना ट्रॅक करत हवेतल्या हवेतच त्यांचा खात्मा करण्याचं काम करमार आहे. ट्रम्प यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी प्राथमिक स्वरुपात 25 बिलियन डॉलरचा सुरुवातीचा खर्च अपेक्षित ठेवलं असून हा संपूर्ण गोल्डन डोम तयार करण्यासाठी तब्बल 175 बिलियन डॉलर इतका खर्च येणार असून, अमेरिकेतच या डोमची निर्मिती केली जाणार आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या माहितीनुसार त्यांच्या कार्यकाळाच्या अखेरीपर्यंत हा गोल्डन डोम अमेरिकेच्या सेवेसाठी पूर्णपणे तयार होणार असून, या प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी जनरल




मायकल गुएटलीन यांच्यावर सोपवण्यात आली आहे. इस्रायलच्या 'आयरन डोम' पासून ही प्रणाली प्ररित असून त्याची क्षमता मात्र याहून कैक पटींनी अधिक असून थेट अंतराळातून शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवलं जाणार आहे. गोल्डन डोममध्ये शेकडो उपग्रह नेटवर्कचा समावेश असून, लाँच झाल्यानंतर काही क्षणातच या सॅटेलाईटच्या मदतीनं शत्रूनकडून होणारा मारा परतवून लावण्यास मदत करणार आहेत. रिअल टाईम डेटा शेअरिंग आणि रडार इंटेलिजेन्सची मदत इथं घेतली जाणार असून, याशिवाय त्यात AI आधारित ट्रॅकिंग आणि फायर कमांडही समाविष्ट असेल. अमेरिकेच्या संरक्षण नितीमधील स्पेस बेस्ड डिफेंस अर्थात अंतराळाच्या मदतीनं तयार झालेली सुरक्षा प्रणाली हे त्यातचं पहिलं पाऊल आहे. ट्रम्प यांच्या माहितीनुसार कॅनडानं या प्रकल्पामध्ये रुचीसुद्धा दाखवली आहे. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे अमेरिकेकडून ही संरक्षण प्रणाली फक्त देशाच्याच संरक्षणासाठी सिमीत ठेवली नसून, नेटो देशांच्या साथीनं एका नव्या भागिदारीसाठीसुद्धा ट्रम्प यांनी तयारी दाखवली. बरं लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे अमेरिकेनं या निर्णयासह चीन आणि रशिया या राष्ट्रांना अप्रत्यक्षरित्या राजनैतिक संदएशही दिला असून, आता जगभरात ट्रम्प यांनी नेमका का निर्णय घेत कोणत्या युद्धाची तयारी सुरु केलीय?

# पाकड्यांना शिकवला धडा, पहलगाम हल्ल्याला एक महिना, भारत अजून काय काय करणार


जम्मू आणि काश्मीरमध्ये पहलगाम येथे 22 एप्रिल 2025 रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्याला एक महिना पूर्ण झाला आहे. त्यात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने पाकमधील दहशतवादी ठिकाणांवर जोरदार हल्ला चढवला. ड्रोन आणि क्षेपणास्त्राने त्या जागांवर अचूक निशाणा साधला. त्यानंतर पाकच्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिले. दोन्ही देशात संघर्ष पेटला. नंतर चारच दिवसात पाकड्यांनी युद्धविरामासाठी भारताशी संपर्क केला. या एका महिन्यात भारताने काय काय कामगिरी बजावली? आणि पुढे काय काय होणार?

NIA कडून पहलगाम हल्ल्याचा तपास 22 एप्रिल 2025 रोजी पहलगाममधील बैसरन व्हॅलीत दहशतवाद्यांनी धर्म विचारून भारतीय पर्यटकांवर गोळीबार केला होता. यामध्ये 26 पर्यटकांचा जीव गेला होता. त्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने NIA ने या सर्व प्रकरणाची सूत्र हातात घेतली. या हल्ल्यामागे 'द रेजिस्टन्स फ्रंट' (TRF)




ही लष्कर-ए-तैयबाशी संबंधित संघटित असल्याचा दावा करण्यात येत आहे. एनआयए याप्रकरणी तपास करत आहे. सिंधु जल करार रद्द पहलगाम हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशीच 23 एप्रिलला, भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू जल करार रद्द केला. पाणी आणि रक्त एकाचवेळी वाहू शकत नाही, अशा स्पष्ट शब्दात भारताने पाकला ठणकावले आहे. पाकिस्तानकडून वारंवार सिंधु जल करार पुन्हा सुरू करण्याचा आग्रह करत आहे. पण त्याला भारताने झिडकारले. ऑपरेशन सिंदूर या हल्ल्याच्या 13 दिवसानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र डागले.

## सौ.प्रतिमा अरुण काळे यांना आचार्य अत्रे साहित्य गौरव पुरस्कार,2025 जाहीर.



काव्यमित्र संस्था,पुणे यांच्या वतीने सलग २५ व्या वर्षी आयोजित राजमाता जिजाऊ,आचार्य अत्रे स्मृतीदिन व छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून भव्य दिव्य पुरस्कार सोहळा व काव्य संमेलनात सरस्वती माध्यमिक विद्यालय,आकुर्डी पुणे ३५ येथील शिक्षिका, कवयित्री,लेखिका,निवेदिका,संपादिका,पत्रकार,पर्यावरण प्रेमी यांना रविवार दिनांक ८ जून २०२५ रोजी तारांगण ऑडीटोरिअम,पिंपरी चिंचवड,सायन्स पार्क,पुणे येथे त्यांच्या शैक्षणिक,सामाजिक,पर्यावरण कार्यासह साहित्यिक कार्याची दखल घेत आचार्य अत्रे साहित्य गौरव पुरस्काराने मा.डॉ.प्रकाश तुरबतमुठ सर,नंदूभाऊ उर्फ बाबूजी वाळंज,मा. योगिता म्हस्के यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.त्यांच्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून म्हणजे साहित्यिक,शैक्षणिक,राजकीय, सामाजिक क्षेत्रातून,मित्र परिवारातून,कुटुंबातून कौतुक होत आहे. सौ.प्रतिमाताई काळे यांनी सर्वांच्या ऋणात राहणे असे मत व्यक्त केले व सर्वांचे मनापासून आभार मानले.


## 'नागास्त्र-1' ने उडवली पाकिस्तानची झोप, आता येणार 'नागास्त्र-2'

भारतीय संरक्षण प्रणाली आता कात टाकत आहे. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला होता. भारतानं पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला. या हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांचे 9 अड्डे उद्ध्वस्त झाले तर 100 पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाले. त्यानंतर पाकिस्तानने देखील भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतानं पाकिस्तानचा हल्ला परतून लावला, पाकिस्तानचे अनेक ड्रोन आणि मिसाईल पाडले, प्रत्युत्तर म्हणून भारतानं केलेल्या हल्ल्यामध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसान झालं, पाकिस्तानचे अनेक एअर बेस उद्ध्वस्त झाले. या हल्ल्यामध्ये भारताच्या स्वदेशी ड्रोन 'नागास्त्र-1' ने महत्त्वाची भूमिका बजावली, भारताचं स्वदेशी ड्रोन असलेलं 'नागास्त्र-1' याचा पाकिस्तानने चांगलाच धसका घेतला.

# पाकिस्तानच्या भिकाऱ्यांचा नाद खुळा!

## रहायला हवेली, फिरायला कार भिकाऱ्यांची नेमकी भानगड काय?

शेजारील देश पाकिस्तानातील लोक तुम्हाला जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी भिक मागताना दिसतील. पण असंही नाही की पाकिस्तानातील सर्व भिकारी ओढावलेल्या परिस्थितीमुळे भिक मागतात. उलट, पाकिस्तानमध्ये भीक मागणे हा मोठा व्यवसाय बनला आहे. तेथील सधन लोकही याला एक व्यवसाय म्हणून स्वीकारत आहेत. भीक मागणे हे पाकिस्तानात आज एक मोठा व्यवसाय बनला



आहे. इस्लामाबादने अधिकृतपणे आपल्या संसदेत सांगितले की, 2024 पासून आतापर्यंत सुमारे 5,000 पाकिस्तानी भिकाऱ्यांना परत त्यांच्या देशात पाठवण्यात आले आहे. यावरुन तुम्ही अंदाज लावू शकता.सर्वात खास गोष्ट म्हणजे पाकिस्तानात दोन प्रकारचे भिकारी आढळतात. एक जे तिथे भीक मागून कसेबसे आपले आयुष्य काढतात. तर दुसरे भिकारी असे आहेत ज्यांची मोठी स्वप्न असतात.

### पाकिस्तानात भिकेचा मोठा व्यवसाय

**या वर्षी फेब्रुवारी महिन्यात एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओमध्ये एका महिला डॉक्टरने दावा केला होता की, तिच्या लग्नानंतर काही महिन्यांनी तिला कळले की, तिच्या सासरच्यांकडे आलिशान घर, SUV, स्विमिंग पूल आणि इतर आलिशान वस्तू भिकेच्या पैशातून खरेदी केल्या गेल्या होत्या. त्यामुळे तिचे लग्न एका शाही भिकारी कुटुंबात झाले आहे.**

# जपानी बाबा वेंगाची ते भयावह भाकीत, जुलै महिन्यात जगावर महासंकट, हे ३ देश होणार उद्ध्वस्त

जापानची गूढ मंगा कलाकार आणि कथित भविष्यवेत्ता रिओ तात्सुकी हिला जापानची बाबा वेंगा असे म्हणतात. तिचे "The Future I Saw" हे पुस्तक सध्या चर्चेत आहे. या पुस्तकात तिने भविष्यातील अनेक घटनांचे भाकीत केले आहे. तिच्या या पुस्तकाने पूर्वोत्तर देशांमध्ये खळबळ उडवली आहे. विशेष म्हणजे तिने यापूर्वी या पुस्तकात अनेक वर्षांपूर्वी काही अशा घटना वर्तवल्या की, त्या प्रत्यक्षात घडल्या आणि त्यामुळे रियो ही भविष्यवेत्ती म्हणून पुढे आली. आता जुलै 2005 मध्ये तिच्या भाकिताने पुन्हा चिंता निर्माण केली



आहे. काय आहे पुस्तकातील दावा रिओ तात्सुकी हिच्या पुस्तकात काही दावे केले आहेत. जुलै 2025 मध्ये जपानमधील दक्षिण महासागरात मोठा ज्वालामुखी फुटेल. समुद्र खवळेल. समुद्रातून पाणी उसळेल. भयंकर त्सुनामी होईल. या ज्वालामुखीमुळे जपानचे दक्षिण द्वीप, तैवानचा किनारपट्टा, इंडोनेशियाचे काही भाग प्रभावित होतील. तात्सुकीचा दावा आहे की, 2011 मधील फुकुशिमा त्सुनामीपेक्षा पण ही त्सुनामी घातक असेल. यामध्ये हजारो लोकांना प्राण गमवावे लागतील. तर अनेक जण जायबंदी होतील असा दावा करण्यात आला आहे. The Future I Saw पुस्तकाची चर्चा 1999 मध्ये "The Future I Saw" हे पुस्तक बाजारात आले होते. त्यावेळी हे मनोरंजक आणि फँटसी असल्याचे बोलले गेले. पण 2011 मध्ये जपानमध्ये त्सुनामी आली आणि सर्वांच्या रिओच्या पुस्तकावर उड्या पडल्या. विशेष म्हणजे या पुस्तकातील तारीख आणि तिने केलेले वर्णन तंतोतंत या घटनेशी जुळले. त्यामुळे रिओ रात्रीतून लोकप्रिय झाली.

...............

### भीतीने अनेकांनी बुकिंग केलं रद्द

**जुलै 2025 मध्ये या त्सुनामीच्या इशाऱ्यामुळे जपान, इंडोनेशिया आणि तैवान येथे जाणाऱ्या पर्यटकांनी धसका घेतला आहे. अनेकांनी ट्रॅव्हल एजन्सींना फोन करून जुलै महिन्यातील बुकिंग एकतर पुढे ढकलले आहे अथवा ते रद्द केलेले आहे. हे बुकिंग 50 टक्क्यांपर्यंत घसरले आहे.**

### काय केले आपत्तीचे वर्णन?

**या पुस्तकात रिओ हिने भविष्यातील नैसर्गिक संकटांची तारीख आणि तिचे स्वरूप याविषयीचे वर्णन करून ठेवले आहे. तिने या पुस्तकात काही नैसर्गिक आणि काही मानव निर्मित घटनांचा उल्लेख केला आहे. अर्थात तिने या गोष्टींसाठी कोणतेही वैज्ञानिक प्रमाण दिले नाही.**

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com